# विकसित भारत निर्मितीत राष्ट्रीय शिक्षण धोरण महत्वपूर्ण- बावीसकर

देशोन्नती वृत्तसंकलन

**देगलूर :** संकलन केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व विद्यापीठे व महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जून २०२४ पासून सुरु झाली असून विकसित भारत निर्मितीत राष्ट्रीय शिक्षण धोरण महत्वपूर्ण ठरणार आहे, असे प्रतिपादन स्वारातीम विद्यापीठ, आंतर विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.सी.आर. बावीसकर यांनी केले.

ते अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील अर्थशास्त्र व शारीरिक शिक्षण विभाग व स्वारातीम विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बी. ए. प्रथम वर्ष अर्थशास्त्र व शारीरिक शिक्षण विषयाच्या नवीन अभ्यासक्रमावर विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार तर प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. लक्ष्मण पाटील, डॉ नागनाथ गजमल, डॉ. नामदेव मुंडे, डॉ. विजय भोपळे, देवेंद्र मोतेवार, विजय उनग्रतवार व प्राचार्य डॉ. मोहन खताळ हे उपस्थित होते यांप्रसंगी प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांचेही मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी डॉ. अशोक टिपरसे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, प्रा. दिपक वावधाने, संग्राम पाटील, गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सर्जेराव रणखांब यांनी तर आभार प्रा. डॉ. संजय देबडे यांनी मानले. (ता.प्र.)

Scanned with OKEN Scanner